सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १६ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जग जोडणे हे मिशन, आठव्या इंडिया मोबाइल काँग्रेसमध्ये पंतप्रधानांनी व्यक्त केला निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

दूरसंचार क्षेत्रातील सुधारणांमुळे इंटरनेट डाटाच्या किमतीत घट झाली आहे. आज इतर देशांतील डाटाची किंमत भारताच्या तुलनेत दहापट जास्त आहे. जगाला जोडणे हेच भारताचे मिशन आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी येथे भरलेल्या इंडिया मोबाइल काँग्रेसच्या उद्घाटनावेळी केले. यावेळी केंद्रीय दळवळणमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया हेदेखील उपस्थित होते. या परिषदेला जगभरातील १२० देशांमधून अधिक प्रतिनिधी आणि सुमारे ९०० स्टार्टअप कंपन्यांनी सहभाग घेतला आहे.

यावेळी पंतप्रधानांनी वर्ल्ड टेलिकम्युनिकेशन स्टँडर्डायजेशन असेंब्लीचेही (डब्ल्यूटीएसए) उद्घाटन केले. याचे आयोजन भारत आणि आशिया-पॅसिफिक प्रदेशात प्रथमच आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाद्वारे करण्यात आले. एअरटेलचे अध्यक्ष भारती मित्तल, आदित्य बिर्ला ग्रुपचे चेअरमन कुमार मंगलम बिर्ला आदींची यावेळी भाषणे झाली.

यावेळी पंतप्रधान म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत भारताने



बसविलेल्या ऑप्टिकल फायबरची लांबी चंद्र आणि पृथ्वीमधील अंतराच्या आठपट आहे. दोन वर्षांपूर्वी आम्ही ५जी लाँच केले. आज देशातील प्रत्येक जिल्हा ५जीने जोडला गेला आहे. आता आम्ही ६जीच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहोत.

मोबाइल भारतात तयार केल्याशिवाय स्वस्त होऊ शकत नाहीत. २०१४ मध्ये देशात फक्त दोन मोबाइल उत्पादन युनिट होते. आज भारतात २०० पेक्षा अधिक निर्मिती युनिट आहेत. पूर्वी परदेशातून फोन आयात करीत होतो. आता देशात सहा पट अधिक फोन बनविले जात आहेत, असे ते म्हणाले. प्राचीन सिल्क रुटपासून आजच्या काळातील तंत्रज्ञानाच्या मार्गापर्यंत भारत केवळ जोडण्याचे काम करीत आला आहे, असे पंतप्रधान यावेळी म्हणाले.

### ११६ कोटी मोबाइल कनेक्शन्स : सिंधिया

ज्योतिरादित्य सिंधिया म्हणाले की, भारतातील मोबाइल कनेक्शन ९०.४ कोटींवरून वाढून ११६ कोटींच्या घरात पोहोचली आहेत. ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटीचे ९२.४ कोटी यूजर्स आहेत. भारतातील ऑप्टिकल फायबल केबल १.१० कोटी किलोमीटरची होती, तीच आज ४.१० कोटी किलोमीटरपर्यंत पोहोचली आहे.

## विधानसभा लढवणार, जिंकणार अन् सत्ता आणणार; राज ठाकरेंचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ मुंबई**

अखेर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहेत. आचारसंहिता लागू होताच राज्यातील राजकारणाला वेग आला आहे. विधानसभा निवडणुकांची घोषणा होताच मनसेच्या बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत विजयाचा निर्धार व्यक्त केला.

पत्रकारांशी बोलताना राज ठाकरे म्हणाले की, विधानसभा निवडणुका लढवणार आणि जोरात लढवणार आहे. माझ्या सभेत सहज म्हणून किंवा




कार्यकर्त्यांचा, सहकाऱ्यांचा उत्साह वाढावा म्हणून काही बोललो नाही. विधानसभा निवडणुका आम्ही जिंकू आणि सत्ता आणू. माझी भूमिका मी मांडली आहे, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. तसेच महायुती सोबत जाण्याच्या प्रस्तावावर बोलताना राज ठाकरे म्हणाले, जर-तरची चर्चा करत नाही. मी माझ्या सभेत बोललो ते बोललो आहे, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

टोलमाफीसाठी आमचीच मागणी होती. खूप पूर्वीपासून आम्ही ही मागणी करत होतो. टोलमुळे आपली फसवणूक होते हा मुद्दाच आम्ही मांडला. टोलमाफी झाली यामुळे मी सरकारचे आभार मानतो. उशिरा का होईना त्यांना या गोष्टी समजल्या. मला काळजी फक्त एकाच गोष्टीची आहे, ती म्हणजे निवडणुकीच्या तोंडावर टोल नाके बंद करायचे आणि निवडणुकीनंतर पुन्हा सुरु करायचे हे चालणार नाही.

## महाविकास आघाडीने केले २१५ उमेदवार निश्चित

### काँग्रेसला ८४, शरद पवार गट व उद्धवसेनेला प्रत्येकी ६५ जागा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ मुंबई**

महाविकास आघाडीच्या तिन्ही घटक पक्षांमध्ये २१५ जागांवर एकमत झाले आहे. उर्वरित ७३ जागांचे वाटपही येत्या तीन दिवसात अंतिम होईल, असे काँग्रेसच्या बड्या नेत्यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले. ज्या २१५ जागा निश्चित झाल्या आहेत. त्यात काँग्रेसला ८४, तर शरद पवार गट आणि उद्धवसेनेला प्रत्येकी ६५ जागा देण्यात आल्या आहेत. एक जागा सपाच्या अबू आझमी यांची अंतिम करण्यात आली आहे.

आज बुधवारी दिल्लीत काँग्रेसच्या स्क्रीनिंग कमिटीची बैठक होणार आहे. त्यानंतर दोन दिवसांच्या आत ३० लोकांची पहिली यादी काँग्रेसकडून जाहीर केली जाणार आहे. दिल्लीत होणाऱ्या बैठकीसाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, के. सी. वेणुगोपाल, मधुसूदन मिस्त्री यांच्यासोबत रमेश चेन्नीथला, महाराष्ट्रातून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय



वडेट्टीवार, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड उपस्थित राहणार आहेत.

या २१५ जागा सर्व सहमतीने अंतिम करण्यात आल्या आहेत, असे सांगून तो नेता म्हणाला, उर्वरित ७३ जागीदेखील मित्र पक्षांसह आघाडीतील तीन प्रमुख पक्षांच्याही जागा असतील. ७३ जागांचा अंदाज बघितला, तर सर्वाधिक जागा काँग्रेसला मिळतील, असे चित्र आहे. विदर्भात काँग्रेससाठी, पश्चिम महाराष्ट्रात शरद पवारांच्या राष्ट्रवादीसाठी, तर मराठवाड्यात ठाकरे यांच्या शिवसेना आणि काँग्रेससाठी जास्त जागा देण्यात आल्या आहेत. मुंबई आणि कोकणात उद्धवसेनेला इतर दोन पक्षांच्या तुलनेत जास्त जागा देण्यात येतील, असेही काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्याने स्पष्ट केले.

महाविकास आघाडीत जागा वाटपावरून वाद असल्याच्या बातम्या येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने २१५ जागा निश्चित करून उत्तर दिल्याचेही ते म्हणाले.

**उद्यापासून पुन्हा बैठक**

आघाडीची गेल्या सहा दिवसांपासून थांबलेली जागावाटपाची चर्चा आता गुरुवारपासून पुन्हा सुरू होणार आहे. आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार येत्या २२ तारखेपासून उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. बैठकीत सर्व जागांचे वाटप होण्याची शक्यता कमीच आहे. १० ते १५ जागांवर शेवटपर्यंत चर्चेचे गुऱ्हाळ सुरू राहील, असे आजचे चित्र आहे.

## लाडकी बहीण योजनेला कोणी टच करायला गेला, तर..., मुख्यमंत्री शिंदेंचा विरोधकांवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ मुंबई**

राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा काल पार पडली आहे. त्यानंतर आज महायुती सरकारच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संयुक्त परिषदेत राज्यात विविध क्षेत्रात विकास झाल्याचा दावा करण्यात आला. यावेळी महायुती सरकारचे रिपोर्ट कार्ड सादर करण्यात आले. या पत्रकार परिषदेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुती सरकारच्या कामाचा लेखाजोखा सर्वांसमोर मांडला आणि विरोधकांवर जोरदार टीका केली.

एकनाथ शिंदे म्हणाले, महायुती सरकारने दोन ते सव्वा



दोन वर्षांच्या कार्यकाळात असंख्य कामे केली आहेत. केलेल्या कामाचे रिपोर्ट काढायला हिम्मत लागते आणि ती हिम्मत महायुती सरकारकडे आहे. पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्र हा पहिल्या क्रमांकावर आहे. आम्ही एवढी कामे केली की ती रिपोर्ट कार्डमध्येही सामावत नाहीत. अटल सेतू, समृद्धी महामार्ग, कोस्टल रोडचे काम सरकारने केले आहे. महाविकास आघाडीच्या काळात विकासकामांना ब्रेक लागला होता. अडीच वर्षांमध्ये महाविकास आघाडी सरकारने प्रकल्प बंद करण्याचे काम केले. महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता. पण महायुतीचे सरकार येताच महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावरून पहिल्या क्रमांकावर आला, असा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

राज्यातला सर्वसामान्य माणूस, कॉमन मॅन त्याच्या आयुष्यात बदल झाला पाहिजे. तो कॉमन मॅन नव्हे सुपरमॅन व्हायला पाहिजे. राज्यातील सर्वसामान्य माणसाला आम्हाला ताकद द्यायची आहे, म्हणून तर आम्ही मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. मेट्रो प्रकल्पाला स्थगिती दिल्याने १७ हजार कोटी रुपये जास्त खर्च झाले. अन्यथा आम्ही लाडक्या बहिणींना अधिक पैसे देऊ शकलो असतो. लाडकी बहीण योजनेसाठी आमचे लक्ष्य २ कोटी ५० लाख रुपये होते. आता सुमारे २ कोटी ३० लाख महिलांच्या खात्यात पैसे गेले. नोव्हेंबर महिन्यात आचारसंहिता लागू होणार हे माहीत होतं, म्हणून ते पैसे ऑक्टोबर महिन्यात देऊन टाकले, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

विरोधक म्हणतात, आम्ही सत्तेत आलो तर पोलखोल करणार, महायुतीने आणलेल्या सर्व योजना बंद करणार, पोलखोल करणार, जेलमध्ये टाकणार, तुमची पोलखोल यापुर्वीच झाली आहे, असं म्हणत शिंदेंनी महाविकास आघाडीला टोला लगावला आहे. या योजना बंद करणाऱ्यांना जनता साथ देणार नाही. हे खुलेआम बोलायला लागले, त्यांच्यात जेलसी निर्माण झाली आहे. त्यांच्या अशा बोलण्याने लोक त्यांच्या विरोधात जातील. लाडकी बहीण योजनेला कोणी टच करायला गेला. तर त्याचा कार्यक्रम झाला समजा. आमच्या लाडक्या बहीणी हे ऐकून घेणार नाहीत. आम्ही त्यांना सांगितलंय केंद्र सरकार आणि आम्ही मिळून आमच्या बहिणींना लखपती बनवणार आहोत, त्यासाठी आम्ही काम करत आहोत, असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

## फडणवीस-शिंदेंचे ग्रह प्रबळ, उद्धव ठाकरेंचं संमिश्र ग्रहमान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ छत्रपती संभाजीनगर**

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. निवडणुकीपूर्वी राज्यातील प्रमुख पक्षांनी अंतर्गत सर्वेक्षणांच्या माध्यमातून जनमताचा आढावा घेतला होता. मात्र, तरीही प्रत्यक्ष निवडणुकीत काय होणार, याबाबत सर्वच राजकीय पक्षांची धाकधूक निकालापर्यंत कायम राहणार आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथील ज्योतिषाचार्य अनंत पांडव गुरुजी यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत महत्त्वाचे भाकीत वर्तविले आहे. त्यांनी सध्या कोणत्या नेत्यांचे ग्रहमान चांगले आहे आणि कोणासाठी चिंता करण्यासारखी परिस्थिती आहे, याबाबतही भाष्य केले आहे.

ज्योतिषाचार्य अनंत पांडव गुरुजी यांनी सांगितल्याप्रमाणे विधानसभा निवडणुकीचे भाकीत वर्तविताना राजकीय पक्षाचे बळ, पक्षप्रमुखाचे ग्रहमान आणि तो उमेदवार किती प्रबळ आहे, यावर अनेक गोष्टी ठरतात. ज्योतिषशास्त्रानुसार महाराष्ट्रातील सगळ्याच राजकीय पक्षांचे बळ काठावर आहे. भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कुंडलीनुसार त्यांचे ग्रह प्रबळ आहेत. तर उद्धव ठाकरे यांची कुंडली संमिश्र ग्रहमान दर्शवित आहे.

## एक्झिट पोलविरोधात कडक कारवाई करण्याची गरज, ...तर गंभीर समस्या; मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांचे वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

हरयाणा विधानसभा निवडणुकांसंदर्भात तयार केलेल्या एक्झिट पोलमागे एक कारस्थान होते असे मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी थेट वक्तव्य केले नाही. मात्र चुकीच्या एक्झिट पोलचे समर्थन करण्यासाठी यंत्रणेचा गैरवापर करण्यात आला, असे विधान त्यांनी केले. एक्झिट पोलविरोधात कडक कारवाई होणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

राजीवकुमार म्हणाले की, मतदान झाल्यानंतर साधारणपणे तिसऱ्या दिवशी मतमोजणी होते. त्यानंतर निवडणुकांची प्रक्रिया संपुष्टात येते. मतदान संध्याकाळी ६ वाजता संपते. त्यानंतर जाहीर होणारे एक्झिट पोल तयार करण्यासाठी कोणत्याही शास्त्रीय पद्धतीचा वापर करण्यात येत नाही. त्या पोलमुळे लोक विशिष्ट अपेक्षा मनात धरून बसतात. त्या पूर्ण न झाल्यास सर्व गोष्टींचा विपर्यास होतो.

ते म्हणाले की, विधानसभा




निवडणुकांच्या मतमोजणीप्रसंगी निवडणूक आयोगाने पहिला कल सकाळी ९.३०ला जाहीर केला; पण त्याच्या आधीच सकाळी ८ वाजल्यापासून निवडणूक निकालांबाबतचे आडाखे झळकविण्यात येत होते. याची चौकशी झाली पाहिजे. अशा प्रकारची विसंगत माहिती प्रसारित केल्यामुळे काही वेळेस गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. अपेक्षा व वास्तव यांच्यातील फरकामुळे कधीकधी निराशा येऊ शकते. त्यामुळे या मुद्द्यावर विचारमंथन व्हायला हवे. मतदान केंद्रांवर मतदारांची ओळख निवडणुकीच्या नियमांनुसार पटविली जाईल. तसेच त्यांच्या सांस्कृतिक मूल्यांचा योग्य आदर राखला जाईल, असे राजीवकुमार म्हणाले. हिजाब परिधान केलेल्या महिलांशी मतदान केंद्रांवर होणाऱ्या वादांबाबत त्यांनी हे वक्तव्य केले.

**प्रसारमाध्यमांनी आत्मपरीक्षण करावे'**

मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार म्हणाले की, एक्झिट पोलमुळे वस्तुस्थितीचा विपर्यास होतो. त्याविषयी प्रसारमाध्यमे विशेषत: इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे. एक्झिट पोल यावर निवडणूक आयोगाचे नियंत्रण नाही. त्यासाठी वेगळी संस्था अस्तित्वात आहे.

## वित्त विभागातील पीएफएमएस प्रणाली अचानक बंद

### प्रशासकीय कामकाज ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती :**

राज्याच्या ग्रामविकास मंत्रालयाने केंद्र-राज्य शासनाच्या धोरणानुसार जिल्हा परिषदस्तरावरील निधीचे वितरण व संनियंत्रण करण्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये एकसूत्रता राहावी, यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयीकृत बँकेने विकसित केलेल्या जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीम या प्रणालीचा वापर करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने फंड मॉनिटरिंग सिस्टीम प्रणालीचा वापर सन २०२०-२१ मध्ये सुरू करण्यात आलेली होती. मात्र, १५ ऑक्टोबर रोजी अचानकच ही प्रणाली वरिष्ठ पातळीवरून बंद करण्यात आली आहे. परिणामी, जिल्हा परिषदेतील वित्त विभागाचे सर्व आर्थिक व प्रशासकीय कामकाज ठप्प पडले आहे. परिणामी, सिस्टीमच बंद पडल्याने वित्त विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना ताटकळत बसून राहावे लागले.

## संपादकीय ......

# कोजागिरीचं अमृतपर्व

*कोजागरी पौर्णिमेच्या रात्री लक्ष्मी प्रत्येक घरात फिरते आणि ती 'को जागर्ती' म्हणजेच कोण जागं आहे, असा प्रश्न विचारते. जागं असणार्यांना तिचा आशीर्वाद मिळतो, अशी कथा आहे. हे जागं असणं म्हणजे आपल्यामध्ये जागृती असणं असा अर्थ घ्यायला हवा. केवळ स्वत:पुरताच विचार न करता समाजातील इतर घटकांचाही विचार झाला पाहिजे, त्यांच्या सुख-दु:खात आपणही सामील असलं पाहिजे.*

*आश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागरी पौर्णिमा अवघ्या महाराष्ट्रभर साजरी केली जाते. नवरात्र नुकतेच संपलेले असते. या दिवशी नभांगणातील पूर्ण चंद्राच्या शीतल प्रकाशानं अवघी सृष्टी तेजोमय झालेली असते. आकाशभर चंद्रकिरणांचा आणि चांदण्यांचा सडा पडलेला असतो. स्वच्छ, नितळ प्रकाशात अवघी धरती न्हाऊन निघत असते. चंद्राच्या या किरणशलाका अतिशय अल्हाददायक आणि मोहक असतात. कोजागरी पौर्णिमेला जागरण करण्याची पद्धत आहे. या दिवशी रात्री लक्ष्मी घराघरांत डोकावून बघत असते आणि 'को जागर्ती' असे विचारत असते. जेथे लोक जागे असतात, तेथे ती प्रवेश करते. त्यांना समृद्धी देते. या दिवशी लक्ष्मी, कुबेर आणि इंद्र यांची एकत्रित पूजा करण्याचीही पद्धत आहे. पाटावर चंदनाचा प्रतीकात्मक चंद्र काढायचा आणि लक्ष्मी, कुबेर म्हणून सुपारी ठेवायची, तर इंद्र म्हणून तांब्याचा कलश ठेवून त्यात आंब्याची पाने ठेवावीत. त्यांची मनोभावे पूजा करावी. या पूजेमुळे घरात अक्षय लक्ष्मी नांदते, अशी समजूत आहे.*

*भारताच्या काही भागांत लोक या दिवशी उपवास ठेवतात. तांब्यावर अथवा मातीच्या घटावर वस्त्रात झाकलेली लक्ष्मीची प्रतिमा ठेवतात. त्याची पंचोपचार पूजा करतात. त्यानंतर चंद्रोदयानंतर सोने, चांदी अथवा मातीचे १०० दिवे तुपाने भरून पेटवले जातात. खीर करून ती चंद्राच्या प्रकाशात ठेवतात. खानदेशाकडील काही भागांत या दिवशी गुलाबाईचे पारणे असते व दुसर्या दिवशी विसर्जन असते. अनंत चर्तुदशीच्या दुसर्या दिवशी घराघरांतून कुमारिका गुलाबाईची स्थापना करतात. गुलाबाई म्हणजे पार्वती. शंकर, पार्वती आणि गणपती यांची एकत्रित मूर्ती तयार केली जाते. यात भरपूर विविधता असते. कमळावर, नागावर, सिंहासनावर बसवलेली गुलाबाई असे प्रकार असतात. आपल्या इच्छेनुसार मूर्ती आणून घरात तिची स्थापना करायची. कोजागरी पौर्णिमेपर्यंत म्हणजे महिनाभर मुली एकमेकींच्या घरी जाऊन गुलाबाईची गाणी म्हणतात. झिम्मा खेळतात, खिरापत वाटतात, पौर्णिमेला याचे पारण करतात. रात्री सार्याजणी आपापल्या गुलाबाईची मूर्ती घेऊन एके ठिकाणी जमवतात. तेथे वेगवेगळी खिरापत प्रसाद म्हणून आणतात. दूध आटवून ते चंद्रप्रकाशात ठेवतात आणि रात्रभर गाणी, खेळ खेळतात. मग खिरापत खाऊन आणि दूध पिऊन आपापल्या घरी जातात. दुसर्या दिवशी मूर्तींचे विसर्जन करतात. गुलाबाई म्हणजे पार्वती महिनाभर माहेरी आलेली असते, असे मानतात. तिला रोज वेगवेगळा नैवेद्य दाखवतात. हा संपूर्ण महिना घराघरांतून कुमारिकांचा चिवचिवाट ऐकायला मिळत असतो. अशा प्रकारे कोजागरी पौर्णिमा साजरी करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. पद्धती वेगळ्या असल्या तरी कोणत्याही रूपात देवीची पूजा करणे हाच या मागचा हेतू आहे. कोजागरी पौर्णिमा म्हटली की, आठवते ती शिवाजी महाराजांच्या काळातील हिरकणीची गोष्ट. तो दिवस कोजागरीचाच होता. महाराजांनी रायगडाच्या सभोवतालच्या गावांतील लोकांना शक्य तेवढे दूध गडावर पोहोचविण्याची आज्ञा दिली होती. गडपायथ्याच्या गावांतील गवळणी दूध पोहोचवायला गडावर पोहोचल्या. हिरकणी आपल्या तान्हुल्याला घरी निजवून गडावर आली होती. दूध दिल्यानंतर गडावरचे वैभव बघताना तिला परतायचे भान राहिले नाही. परतीचा रस्ता धरला तेव्हा गडाचे दरवाजे बंद झाले होते. नियमानुसार ते सूर्योदयाच्या वेळीच उघडणार होते. सह्याद्रीची ही कन्या आपल्या मातृत्वाखातर गडाच्या अत्यंत अवघड कड्यावरून खाली उतरत आणि पळत आपल्या तान्हुल्याजवळ गेली, त्याला छातीशी धरले. महाराजांना ही गोष्ट दुसर्या दिवशी समजल्यावर त्यांनी हिरकणीला बोलावून तिचा सत्कार केला आणि कड्याला तिचे नाव दिले. कोजागरीची ही आठवण इतिहासाच्या पानांवर कायमची उमटली गेली आहे.*

# नाशिकची पोषण आहारात उल्लेखनीय कामगिरी; राज्यात प्रथम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६नाशिक :** जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागातर्फे दरवर्षी जिल्ह्यात १ ते ३० सप्टेंबर कालावधीत राष्ट्रीय पोषण महाअभियान राबविण्यात येते. २०२२ मध्ये राज्यात सर्वाधिक उपक्रम राबवून त्याची केंद्र शासनाच्या जनआंदोलन डॅशबोर्डवर यशस्वी नोंद केल्याबद्दल नाशिक जिल्ह्याला प्रथम क्रमांकाने, तर २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय काम केल्याबाबत विशेष पुरस्काराने राज्याच्या महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे, सचिव अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे यांच्या उपस्थितीत प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

राज्याच्या महिला व बालविकास विभागाकडून मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात नाशिक जिल्ह्याचा प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आला. नाशिक जिल्ह्याच्या वतीने महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील तसेच पेठ प्रकल्पाचे बालविकास प्रकल्प अधिकारी पंडित वाकडे व हरसूल प्रकल्पाच्या मंगला भोये यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

अभियानाच्या माध्यमातून ५ उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विविध उपक्रम घेतले जातात. कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, जन्मतः कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण कमी करणे, महिला व किशोरवयीन मुली यांच्यातील रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्याबरोबरच बुटकेपणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी लोकचळवळ उभी केली जाते. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली.



**राष्ट्रीय पोषण महाअभियान हा केंद्र सरकारचे महत्त्वाकांक्षी अभियान असून, माता व बालकांना सशक्त करण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने हे अभियान राबविण्यात येते. याच्या अंमलबजावणीबाबत सन २०२२ व २०२४ या दोन वर्षांत नाशिक जिल्ह्याचा सन्मान होणे ही आनंदाची व अभिमानाची बाब आहे.**

**आशिमा मित्तल,** सीईओ, जिल्हा परिषद, नाशिक.

# कोरडवाहू रब्बी पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी 'असे' करा जलसंवर्धन

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

उशिरापर्यंत पडणाऱ्या पावसाचा रब्बी हंगामातील पिकांसाठी योग्य प्रकारे जलसंवर्धन करून फायदा घेतला पाहिजे. रब्बी हंगामातील ज्वारी, करडई, हरभरा तसेच काही भागात थोड्याफार प्रमाणात गहू ही पिके खरीपात पडलेल्या पावसाच्या खोलीवर घेतली जातात. तसेच खरिपात लागवड केलेली परंतु पिकाची उर्वरित वाढ रब्बी हंगामात होते. कापूस व तूर या पिकांनाही खरिपात पडलेल्या पावसाच्या ओलाव्याचा फायदा होतो.

खरीपातील या पिकांच्या तसेच रब्बी हंगामात घेतलेल्या कोरडवाहू पिकांच्या फुलोरा आणि दाणे भरण्याच्या अवस्थेत हा ओलावा जमिनीत पुरेशा प्रमाणात असणे पीक उत्पादनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असतो. एकंदरीत उशिरा पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब योग्य ती उपाययोजना करून जमिनीत मुरवणे फायद्याचे ठरते.




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**कसे करावे जलसंवर्धन?**

उथळ व मध्यम जमिनीत समपातळीतील व खोल जमिनीत ढाळीच्या बांधाव्यतिरिक्त पिकांची पेरणी तसेच पेरणीपूर्वीची सर्व मशागतीची कामे उताराला आडवी करावीत. खरीप पिकांची काढणी झाल्यानंतर आवश्यक ती मशागतीचे कामे पूर्ण करून पिकांच्या प्रकारानुसार सरीवरंबा, सारे किंवा गादीवाफे अशा वेगवेगळ्या प्रकारची रानबांधणी पीक पेरणीच्या अगोदर करून ठेवावी.

रब्बी हंगामात शिफारस केलेल्या पेरणीच्या वेळेपूर्वी पावसाच्या पाण्याचे संवर्धन होऊन जमिनीतील ओलाव्याची जास्तीत जास्त काळापर्यंत साठवणूक व्हावी म्हणून शक्य असतील तेवढ्या दोन किंवा तीन कोळपण्या कराव्यात. तूरकाट्या, धसकटे, वाळलेले गवत, गव्हाच्या काडाच्या आच्छादनाचा वापर पिकांच्या दोन ओळीत केल्यानेही जमिनीत दीर्घकाळ ओलावा टिकून राहतो.

– डॉ. कल्याण देवळाणकर (कृषीतज्ज्ञ)

# विधानसभा निवडणुकासाठी काँग्रेसच्या वरिष्ठ निरीक्षकांची नियुक्ती

## अशोक गेहलोत, भूपेश बघेल, चरणजितसिंह चन्नी, सचिन पायलट यांच्याकडे विभागनिहाय जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६मुंबई-** काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकासाठी विभागनिहाय वरिष्ठ निरीक्षकांची नियुक्ती केली आहे.

मुंबई व कोकण विभागासाठी राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत व डॉ. जी. परमेश्वर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विदर्भासाठी छत्तिसगडचे माजी मुख्यमंत्री भुपेश बघेल, पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजीतसिंह चन्नी, उमंग सिंघर यांची नियुक्ती केली आहे. मराठवाड्यासाठी राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट व तेलंगाणाचे मंत्री उत्तमकुमार रेड्डी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रासाठी टी. एस. सिंगदेव व एम. बी. पाटील तर उत्तर महाराष्ट्रासाठी डॉ. सय्यद नासीर हुसेन व डी. अनसुया सिथक्का यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.



अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकूल वासनिक व अविनाश पांडे हे या निवडणुकीसाठी वरिष्ठ समन्वयक असतील असे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने जाहीर केले आहे.




## पायदुखीची समस्या आहे ?

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक** -आपल्या शरीराचे सर्व वजन आपले पाय पेलत असतात. आपण चालतो, धावतो ते याच पायांच्या जोरावर. शरीरातील हाडांपैकी एक चतुर्थांश हाडे ही पायामध्ये असतात. त्यामुळेच पायाला काहीही झाल्यास त्याचा संपूर्ण शरीरावर परिणाम होत असतो. त्यामुळे पायांची काळजी घेणे हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे.

**पायाची सूज आणि पेटके :**

पायांच्या स्नायूंन येणारी सूज ही चार्ली होर्सेस नावाने ओळखली जाते. त्यामुळे अस्वस्थता येते; पण शरीरातील कमतरतांचे हे लक्षण आहे. पाण्याच्या कमतरतेमुळे स्नायूंना कमी ऑक्सिजन मिळतो आणि पोषक द्रव्यांची कमतरता भासते किंवा सोडियम, कॅल्शियम, पोटॅशिअम किंवा मॅग्नेशिअम यांसारख्या पोषक द्रव्यांची शरीराला कमतरता जाणवते.

आपल्याला चालताना पायात पेटके आल्यास पायात रक्ताभिसरण नीट होत नाही असे समजावे. स्नायूंना सूज आली असेल, तर आपल्याला अतिथकायला होते किंवा व्यायाम करताना पाय ताणला जात नाही. काही वेळा पायातील शूज किंवा चप्पल बदलल्यास प्रश्न सुटू शकतो.

**पाय गार पडणे :** असे होत असेल, तर रक्ताभिसरण नीट होत नसल्याचे लक्षण आहे हे समजावे. तसेच मधुमेह, हायपोथायरॉडिझ किंवा अशक्तपणा आहे हे स्पष्ट होते. त्याशिवाय आपल्या पायाचा रंगही हळूहळू बदलू लागतो. काही वेळा लाल पाय पांढरा पडतो, पांढरे पाय निळे पडतात. या आजाराला रायनॉड असे नाव आहे. त्यात रक्तवाहिन्या अरुंद होतात.

**सुजलेले पाय :** काही वेळा पायाला आलेली सूज ही जीवघेणी ठरू शकते. मुळातच रक्ताभिसरण कमी होत असल्याने त्याच्याशी निगडीत रोग शरीरात ठाण मांडू शकतात. हृदयविकास मूत्राशयाचे काम बंद पडणे, यकृत बंद पडणे यासारखे त्रास होतात शिवाय काही वेळा रक्ताच्या गाठी होण्याचा धोका असतो, तर पेशींमध्ये अनियमितपणे पाणी होण्याची शक्यता असते.



पायाला लालपणा आला असेल, तो गरम होत असेल किंवा दाह होत असेल, तर पायात संसर्ग झाला असण्याची शक्यता असते. पायाला फ्रॅक्चर झाले असेल, तर पायाला सूज येते आणि आगही होते. पायाला सूज असूनही तो दुखत नसेल, तर शरीरात अनावश्यक पाणी निर्माण होऊन ते शरीरात साठत असल्याचे द्योतक असते. त्यावर काही घरगुती उपाय केले जाऊ शकतात. घरात बसल्यानंतर व्यायाम म्हणून पाय वर करून ठेवा.

आहारातील मीठाचे प्रमाण कमी करावे. घट्ट कपडे घालू नये. तसेच वजन आटोक्यात ठेवल्यानेही मदत मिळते. काही वेळा पायाला बधीरपणा किंवा मुंग्या आल्यासारखा अनुभव येतो. रक्ताभिसरणातील अनियमिततेमुळे पेरिफेरल नव्र्व्हस सिस्टीमला त्याचा फटका बसतो. मधुमेह असणाऱ्या व्यक्तींमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण सतत जास्त असले, तर नसा खराब होतात. त्यामुळे पायाला बधीरपणा येतो. ही काहीवेळा खूप गंभीर स्थिती असते.

# आज कोजागिरी पौर्णिमा

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

हदगा किंवा भोंडला हा आश्विन मासात मुलींनी करावयाचा कुळाचाराचाच प्रकार आहे. पण हा कुळाचार एखाद्या विशिष्ट घराण्याचा नसून मुली-मैत्रीणी यांनी एकत्र जमून साजरा करावयाचा सांघिक कुळाचार आहे. नवरात्रीपासून कोजागरी पर्यंत पंधरा दिवस हा खेळ रंगतो. ज्यांना नवरात्रीत हा खेळ खेळता आला नाही, त्यांनी कोजागरीला एकत्र जमून हदगा किंवा भोंडला अवश्य खेळा. त्यासाठी सविस्तर माहिती जाणून घ्या. आश्विन मासामध्ये हस्त नक्षत्राला प्रारंभ झाला की त्या दिवसापासून नंतरचे सोळा दिवस अगर नवरात्राचे दहा दिवस हदगा साजरा करतात. एका पाटावर तांदळाने किंवा खडूने हत्ती काढतात व त्याभोवती मुली फेर धरून 'ऐलमा पैलमा गणेशदेवा' वगैरे भोंडल्याची गाणी म्हणतात. नंतर जिच्या घरी भोंडला असेल, ती पातेल्यात झाकून खिरापत घेऊन येते. ती खिरापत काय असेल हे इतर मुलींनी ओळखायचे असते. ते जोपर्यंत ओळखले जात नाही, तोपर्यंत खिरापत वाटली जात नाही. पाटावर हत्ती काढतात तसे काही ठिकाणी हदग्याच्या झाडाची फांदी उभी करून त्याभोवती फेर धरण्याची प्रथा आहे. हदगा हा एक पावसाचा उत्सव आहे. हस्त नक्षत्रातील पाऊस हा गड,




## कोजागरीला गजपूजाविधी व्रत केल्याने होते ऐश्वर्यप्राप्ती; जाणून घ्या विधी!

गड, गड असा आवाज करत पडतो. पण खरे तर हे पावसाळ्याच्या अखेरचे दिवस असतात. नवरात्रात मुसळधार पाऊस पडल्यानंतर सूर्याचा लख्ख प्रकाशही अनेक वेळा पडतो. आकाशात इंद्रधनुष्य दिसू लागते. पावसाचे पाणी प्यायल्यामुळे पृथ्वी हिरवागार शालू परिधान करावी तशी दिसू लागते. हत्ती हे वैभवाचे प्रतीक व लक्ष्मीचे वाहन आहे. कोजागरीच्या रात्री हत्तीची पूजा करून किंवा पाटावर तांदूळाचा हत्ती काढून त्याला दूध साखरेचा नैवेद्य दाखवला जातो. पाटाभोवती फेर धरून भोंडला खेळला जातो. दूध आटवले जाते. त्यात पौर्णिमेच्या चंद्राची किरणे पडली की ते आटीव दूध नैवेद्य म्हणून सर्वांना दिले जाते.

हस्त नक्षत्रातील पावसाला खूप महत्त्व आहे. ऋपडतील हत्ती तर पिकतील मोती' असे म्हटले जाते. अर्थात पाऊस पुरेसा पडला तर धनधान्य मिळेल आणि हत्तीच्या सोंडेने लक्ष्मीकृपा होईल व वैभवलक्ष्मी कृपाशिर्वाद देईल. असे हे व्रत गजपूजाविधी म्हणून करा किंवा भोंडल्याची खेळ म्हणून करा, लक्ष्मीची कृपा होईलच!

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १६ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# बँकांमधील मोठ्या व्यवहारांवर आयकर विभागाची करडी नजर

## 'एसएलबीसी'ला द्यावा लागणार रोज अहवाल : सहकार आयुक्तांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती–** आचारसंहितेदरम्यान आर्थिक संस्थांमध्ये होणाऱ्या रोखीच्या व्यवहारावर आयकर विभागाचा वॉच राहणार आहे. एखाद्या खात्यात १० लाखांवर जमा झालेली रक्कम व एकाच खात्यातून दोन हजारांवर रक्कम १० पेक्षा जास्त खात्यात जमा करण्यात आली असल्यास चौकशीचा फेरा मागे लागणार आहे. सर्व बँकांनी विहित नमुन्यात रोज 'एसएलबीसी' व आयकर विभागाला अहवाल पाठविण्याचे निर्देश सहकार आयुक्तांनी गुरुवारी दिले आहेत.

आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने आयोगाद्वारे आवश्यक खबरदारी घेतली जात आहे. या कालावधीत आर्थिक संस्थांकडून होणाऱ्या सर्व रोख व्यवहारांवर आयकर विभागाद्वारे नजर ठेवण्यात येत असते. त्यामुळे राज्यातील सर्व राष्ट्रीयीकृत, खासगी, जिल्हा बँका व नागरी सहकारी बँका यांनी प्रपत्रात रोज माहिती (एसटीआर, सीटीआर) आयकर विभागासह राज्यस्तरीय बैंकिंग समिती (एसएलबीसी) यांना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विभाग व जिल्हास्तरावर सनियंत्रण कक्षदेखील स्थापित करण्यात येणार आहे. जिल्ह्यात मुख्यालय असणाऱ्या सर्व नागरी सहकारी बँकांची (मल्टिस्टेट बँकांसह) बैठक आयोजित करण्यात येणार आहे व अनुषंगाने माहिती एकत्र करण्याची जबाबदारी जिल्हा समितीची राहणार असल्याचे पत्रात नमूद आहे.

### हे व्यवहार राहतील संशयाच्या भोवऱ्यात

'एसएलबीसी'च्या पत्रानुसार पहिल्या 'अ' नमुन्यात एका खात्यातून एकाच दिवशी झालेले दहा लाखांवर व्यवहार दुसऱ्या 'ब'नमुन्यात एका महिन्यात एका खात्यातून दहा लाखांवर झालेले आर्थिक व्यवहार व तिसऱ्या 'क' नमुन्यात एका खातेदाराद्वारे एका दिवसात १० पेक्षा अधिक व्यक्तींना दोन हजारांवर पाठविण्यात आलेली रक्कम याची माहिती रोज द्यावी लागणार आहे.

### जिल्हा समितीचे डीडीआर अध्यक्ष

जिल्हा व विभागस्तर ३ सनियंत्रण समिती चार सदस्यांची राहील. यामध्ये विभाग समितीचे अध्यक्ष विभागीय सहनिबंधक तर जिल्हा समितीचे जिल्हा उपनिबंधक अध्यक्ष आहेत.

आयोगाने २७ सप्टेंबरच्या बैठकीत याबाबत निर्देशित केलेले २ आहे. शिवाय एसएलबीसी, सहकार व पणन विभागाद्वारे याबाबत सहकार आयुक्तांना पत्र देण्यात आलेले आहे.

# आ. बच्चू कडू मुख्यमंत्र्यांच्या भेटीला

## समजूत काढण्याचा प्रयत्न ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती :** विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर होण्याआधी मुंबईत वेगवान घडामोडी पहायला मिळाल्या. परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीचे प्रमुख नेते आमदार बच्चू कडू मंगळवारी दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी पोहचले. या ठिकाणी शिवसेना शिंदे गटाचे नेते आनंदराव अडसूळ, संजय शिरसाट आदी उपस्थित होते. यावेळी बच्चू कडू यांची समजूत काढण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती आहे.



दुसरीकडे, आमदार बच्चूकडू यांनी त्यांच्या अचलपूर मतदार संघातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पाची कामे मार्गी लावण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली. इतरही विकास कामांबाबत चर्चा झाली. बच्चू कडू यांनी त्यासाठीच मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, असे त्यांच्या निकटच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, यासंदर्भात बच्चू कडू यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांचा मोबाईल क्षेत्राच्या संपर्क बाहेर असल्याचा संदेश प्राप्त झाला. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया कळू शकली नाही.तिसऱ्या आघाडीच्या माध्यमातून वेगळी चूल मांडलेल्या बच्चू कडू यांना पुन्हा सोबत घेण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी त्यांची समजूत काढल्याची चर्चा सुरू झाल्यामुळे राजकारण चांगलेच तापले आहे. बच्चू कडू यांनी गेल्याच महिन्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या सहकार्याने परिवर्तन महाशक्तीची घोषणा केली होती. तिसऱ्या आघाडीच्या रुपात आपण मतदारांना पर्याय देणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. निवडणुकीची तारीख घोषित होण्याआधी कडू यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात बच्चू कडू नेमकी कोणती भूमिका घेणार? काही वेगळा निर्णय घेणार का? अशी चर्चा रंगू लागली आहे.


# राणा दाम्पत्याने केली संरक्षणाची मागणी

## पोलीस आयुक्तांना स्वीय सहायकामार्फत दिले पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती –** माजी खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांनी त्यांचे स्वीय सहाय्यक उमेश ढोणे यांच्यामार्फत पोलीस आयुक्तांना पत्र दिले असून त्या पत्रातून त्यांनी पोलीस प्रशासनाकडे पोलीस संरक्षणाची मागणी केलेली आहे.

नवनीत राणा यांना केंद्र सरकारने राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षा बलाची (सीआयएसएफ) वाय दर्जाची तर आमदार रवी राणा यांना राज्य सरकारची वाय प्लस दर्जाची सुरक्षा देण्यात आलेली आहे. माजी खासदर नवनीत राणा यांना ११ व १४ ऑक्टोबरला धमकीचे पत्र मिळालेले आहे. संबंधित पत्र



हैद्राबाद येथून अज्ञात व्यक्तीने पाठविलेले आहे. त्या पत्रात त्यांना जीवे मारण्याची व सामुहिक दुष्कर्म करण्याची धमकी दिलेली आहे. आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झालेली आहे. नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांना निवडणुकीच्या प्रचारादरम्यान गर्दीच्या ठिकाणी जावे लागणार आहे. गर्दीच्या ठिकाणी अनुचित प्रकार घडू नये वसमाजकंटकांकडून नवनीत राणा यांना धोका उत्पन्न होऊ नये, यासाठी त्यांना पोलिस संरक्षण देण्यात यावे, असे या पत्रात उमेश ढोणे यांनी नमूद केलेले आहे.

# ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिलांसाठी विशेष उपाय योजना


## मतदान केंद्रांवर बसण्यासाठी ठेवणार बेंच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती**

७मतदान केंद्रांवर मतदारांच्या मतदान संपण्याआधी लांबलचक रांगा असतात, तसेच मतदान केंद्र हे मुख्य द्वारापासून लांब असते. अशात मध्यमवयीन, नुकतेच आजारातून सावरलेले, ज्येष्ठ





नागरिक यांना मतदान करणे सुविधाजनक व्हावे, यासाठी रांगांलगत खुर्चा, बेंच ठेवले जाणार आहेत. प्रत्येक मतदान केंद्रांवर खुर्चा, बेंचची व्यवस्था करावी लागणार असून, जिल्हा प्रशासनाने आतापासूनच यासंदर्भातील तयारीचे आदेश दिले आहेत. मध्यमवयीन महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला,

अंशतः दिव्यांग यांना मतदान केंद्रावर कोणतीही अडचण येऊ नये यासाठी ही सुविधा दिली जाणार आहे. यासोबतच मतदान केंद्रावर पेंडाल,

रॅम्प, सीसीटीव्ही, प्रकाश व्यवस्था, पाण्याची सोयही अनिवार्य करण्यात आली आहे. ग्रामीण भागासह आदिवासी भागातील मतदान केंद्रांकडे विशेष लक्ष देत तेथे आधीच सर्व सोयी, सुविधा उभ्या करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. यासंदर्भात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही. रांगांमध्ये बसण्याची सोय राहणारच असेही त्यांनी आवर्जुन सांगितले. तसेच याबाबत मतदारांना माहिती मिळावी, याचेही

प्रयत्न केले जातील, असे ते म्हणाले. अनेकदा ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला, प्रसूती झालेली महिला, तान्हे बाळ असलेली महिला, मध्यमवयीन लांबच लांब रांगांमध्ये उभे राहण्याचा कंटाळा करतात. त्याचा परिणाम एकुण मतदानाच्या टक्केवारीवर होतो. मतदान कमी होते.

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी काही बाबी साधारण वाटत असल्या तरी त्या आवश्यक आहेत. विदेशात मतदान रांगेत अशी सोय असते. त्यामुळे नागरिक थकले की त्यांना खुर्ची, बेंचवर बसता येते. त्यामुळे मतदान प्रक्रिया आणखी सुलभ होते. यंदाही मतदानाची टक्केवारी वाढावी, या दृष्टीनेआवश्यक ते सर्व उपाय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जिल्हा निवडणूक विभाग व प्रशासनासह केले जाणार आहेत.

# सामाजिक एकता आणि महाराष्ट्राचा वारसा जपणारी ' सामाजिक एकता यात्रा'

## अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सर्वांना सामील होण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती–** आजकालच्या वाढत्या सामजिक तणावाच्या बातम्या आपण नेहमीच बघत आहोत. या सर्वांमुळे समाजामध्ये तेढ निर्माण होऊन समाज हा जाती–जाती मध्ये विभागला जात आहे. अशा या सामाजिक तणावाच्या वेळेस तुकडोजी महाराज यांच्या भजनाच्या ओळी महत्व पूर्ण ठरतात, या भारतात बंधु–भाव नित्य वसू दे। दे वरचि असा दे ।। हे सर्व पंथ – संप्रदाय एक दिसू दे । मतभेद नसू दे ।। या शिकवणीवर आधारित 'सामजिक एकता' या महत्वपूर्ण मुद्द्याला अनुसरून यात्रा आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेमध्ये महाराष्ट्रातील विविध जाती, धर्म आणि समाजातील एकतेची महती अधोरेखित करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील संत आणि समाजसुधारकांनी उच्च–नीचतेचा, अस्पृश्यतेचा विरोध करून समाजात एकात्मतेची भावना निर्माण केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने नेहमीच एकतेचा संदेश दिला. संत तुकाराम, गाडगेबाबा, राष्ट्रसंत




तुकडोजी महाराज यांच्यासारख्या महान संतांनी आपल्या कीर्तनातून आणि विचारधारेतून समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी मोलाचे कार्य केले आहे. या यात्रेमध्ये समाजातील भिन्नता ही आपली शक्ती कशी बनू शकते यावर चर्चा होईल आणि कशाप्रकारे सामाजिक एकता राष्ट्रीय एकात्मतेचा मूलाधार आहे, यावर प्रकाश टाकण्यात येईल. सामाजिक एकतेचे महत्व आणि त्याचे सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे महत्त्व, महाराष्ट्रातील जाती–भेद, धर्म आणि प्रांतवाद दूर करून राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे आवाहन, संतांचा वारसा आणि त्यांचे एकात्मतेचे संदेश याचा आधुनिक समाजावर होणारा प्रभाव, राजकीय व सामाजिक आंदोलनांनी सामाजिक ताणतणाव निर्माण होऊ नये याबाबत जागरूकता हे काही या सामजिक एकता यात्रेचे प्रमुख उद्दिष्टे आहेत. दिनांक १८ ते २६ ऑक्टोबर दरम्यान आयोजित या समता यात्रेमधे जवळजवळ ७५ महाविद्यालये, १५ जूनियर कॉलेज व शाळा, २५ वस्तीगृह सामील होणार असून दीडशे गावांना जोडणारी अशी ही ६५० किलोमीटर दूर भव्य एकता यात्रा आयोजीत करण्यात आली आहे. या यात्रेची सुरूवात गुरुग्राम मोझरी येथून असून समारोप संत गाडगेबाबा समाधी मंदिर, गाडगेनगर, अमरावती येथे होणार आहे. या रॅलीमध्ये सर्वांनी मोठया संख्येने सामिल होवून राष्ट्रिय एकात्मतेचा संदेश देण्याचे आवाहन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अमरावती विभागातर्फे करण्यात आले आहे.

# परवानाधारक फटाके विक्रेत्यांची तपासणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती–**

दिवाळीचा सण १५ दिवसांवर आल्यामुळे – शहरात फटाके विक्रीची दुकाने थाटली जाणार आहेत. त्यामुळे परवानाधारक – विक्रेत्यांची तपासणी सुरू करण्यात आली – आहे. शहरात २०० परवानाधारक फटाके विक्रेते आहेत. ठोक विक्रेत्यांनी आतापासूनच फटाक्यांच्या विक्रीला सुरुवात केली आहे.



दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या दुकानात कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून मनपाच्या बाजार परवाना विभागासह पोलिसांद्वारे शहरातील परवानाधारक फटाका विक्रेत्यांची तपासणी सुरू केली आहे. सर्व फटाका विक्रेत्यांच्या कागदपत्रांची तपासणी केली जात आहे. ही प्रक्रिया यापुढेही सुरूच राहणार आहे.

# प्लास्टिक फुलांवर बंदी आणणार का?

## उच्च न्यायालयाची केंद्र सरकारकडे विचारणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६मुंबई –** एकदाच वापरण्यायोग्य (सिंगल यूज) प्लास्टिकच्या वस्तूंवर बंदी घालण्याच्या यादीत प्लास्टिकच्या फुलांचा समावेश करण्याच्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या (सीपीबीसी) शिफारशीचा विचार केला की नाही? अशी विचारणा करत उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्रात प्लास्टिकच्या फुलांच्या वापरावर बंदी घालावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका नैसर्गिक फूल उत्पादकांच्या संघटनेने उच्च न्यायालयात केली आहे. या याचिकेवरील सुनावणी मंगळवारी मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठापुढे झाली.

गेल्या सुनावणीत न्यायालयाने राज्य सरकार व केंद्र सरकारला प्रतिज्ञापत्र सादर



करण्याचे निर्देश दिले होते. मंगळवारच्या सुनावणीत न्यायालयाने म्हटले की, सीपीबीसीने केंद्र सरकारला पत्र लिहून रसायन आणि पेट्रोकेमिकल्स विभागाने तज्ज्ञांची समिती नेमल्याचे कळविले होते. त्या समितीने सिंगल यूज प्लास्टिकच्या बंदी घालण्याच्या यादीत प्लास्किटच्या फुलांचा समावेश करण्याची विनंती केली होती. त्यावर केंद्र सरकारच्या वकिलांनी संबंधित समितीने तशी शिफारस केली नव्हती, असे न्यायालयाने सांगितले.सीपीबीसीने पत्राद्वारे केलेल्या विनंतीवर सरकारने विचार केला आहे का? आणि त्यावर निर्णय घेतला आहे का? याची माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे द्या, असे निर्देश न्यायालयाने केंद्र सरकारला दिले.

# धामणगावात जिल्ह्यातील पहिल्या विज्ञान केंद्राचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६धामणगाव रेल्वे : –** जिल्ह्यातील १७८ परस्परसंवादी प्रदर्शन असलेले पहिले विज्ञान केंद्र धामणगाव शहरात साकारले आहे. या विज्ञान केंद्राचे लोकार्पण आ. प्रताप अडसड यांच्या हस्ते सोमवार १३ ऑक्टोबर रोजी झाले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिकांशी दूरस्थ संवाद साधला. धामणगावात विपश्यना केंद्र, बेंडोजी महाराज संस्थानला निधी उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनीसांगितले.

मतदारसंघातील २,३५३



कोटी १२ लाख रुपयांच्या एकत्रित विकासकामांची पायाभरणी यावेळी करण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सभापती रामदास निस्ताने, माजी सदस्य रवींद्र मुंदे, न.प.चे सीईओ अमोल माळकर, मनोहर बारसे, आठवले गटाचे प्रशांत मून, अनिता तिखिले, दुर्गाबक्षसिंह ठाकूर यांनी मत व्यक्त केले. संचालन व आभार अशोक शर्मा यांनी केले.


# आचारसंहितेआधी मनपाची ३० कोटींच्या विकासकामांना मंजुरी

## सर्वसामान्यांचा त्रास टाळण्यासाठी काही कामे झाली सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

आचारसंहितेमुळे विकासकामे ठप्प पडतात. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे कामे रखडतात. त्यांना हकनाक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळेच मनपा प्रशासनाने विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याआधी ३० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देत निविदा प्रक्रियाही पूर्ण केली.





शहरातील रस्ते, नाल्या, पथदिवे, प्रकाशझोत, ट्री गार्ड, तारेचे फेन्सिंग, सुरक्षा भिंत, पेव्हिंग ब्लॉक्स अशा विविध कामांना तातडीने मंजुरी देण्यात आली. मागील काही दिवसांत जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर करण्यात आलेली ३५ कोटींची कामेही मंजूर केली असून, त्यापैकी काहींचे काम सुरूझाले आहे. ज्या कामांना आचारसंहिता लागण्याच्या आधी मंजुरी व कार्यारंभ आदेश दिले, ती विकासकामे आचारसंहितेतही पूर्ण करता येतात. त्यात कोणतीही अडचण येत नाही. मात्र, आचारसंहिता लागल्यानंतर कोणतेही विकासाचे काम मंजूर करून कार्यारंभ आदेश देता येत नाही. त्यामुळे मनपा प्रशासनाने एका आठवड्यापासून कामाची गती वाढवून जेवढी कामे हातावेगळी करता येतील, तेवढी कामे पूर्ण करण्याचा निकराने प्रयत्न केला. नगरोत्थान निधी अंतर्गत १०२ कोटींची काही कामे मंजूर केली असून, काही कामे पाइपलाइनमध्ये आहेत. काही सुरू झाली असून काही कामे आचारसंहिता आटोपल्यानंतर सुरू केली जातील, अशी माहिती मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिली.

# भाजपचा नेता-कार्यकर्ता महायुती विरोधात बोलला तर कठोर कारवाई

## प्रदेशाध्यक्षांचा थेट इशारा



### निवडणूक आयोगाविरोधात बोलण्याचा मुद्दाच नाही

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यावर विरोधी पक्षांकडून सरड्यासारखा रंग बदलण्यात आला आहे. ते एकाच टप्प्यात निवडणूक का आहे असा सवाल करत आहेत. मात्र लोकसभेत सात टप्प्यात निवडणूक झाली तेव्हादेखील त्यांनी टीका केली होती व आता महाराष्ट्रात एकाच टप्प्यात निवडणूक होत असताना ते परत निवडणूक आयोगाविरोधात बोलत आहेत. त्यांना निवडणूकीत पराभव दिसतो आहे. त्यामुळे ते असा प्रकार करत आहेत, असे प्रतिपादन बावनकुळे यांनी केले.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ नागपूर-** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षातील वाचाळवीरांविरोधात भारतीय जनता पक्षाने कठोर भूमिका घेतली आहे. रामटेकमध्ये माजी आमदार मल्लिकार्जून रेड्डी यांना निलंबित केल्यानंतर पक्षात खळबळ उडाली असताना प्रदेशाध्यक्षांनी इतर ठिकाणीदेखील आवश्यकता पडल्यास असेच पाऊल उचलण्यात येईल, अशी भूमिका मांडली आहे. भाजपचा नेता-कार्यकर्ता महायुतीविरोधात बोलला तर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराच त्यांनी दिला आहे.

मागील काही काळापासून पक्षातील वाचाळवीरांमुळे महायुतीत दरी निर्माण होते की काय असे चित्र निर्माण झाले होते. राज्यातील विविध भागांमध्ये अशा वाचाळ पदाधिकाऱ्यांमुळे पक्ष अडचणीत येत होता. मागील महिन्यातच बावनकुळे यांनी अशा नेत्यांना इशारा दिला होता. मात्र तरीदेखील काही जणांनी तशीच भूमिका ठेवली आहे. पक्षाच्या धोरणांविरोधात भूमिका घेतल्यामुळे रेड्डी यांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले. मात्र केवळ रेड्डींवरच कारवाई थांबणार नसल्याचे संकेत प्रदेशाध्यक्षांनी दिले आहेत. पक्षाने काही कठोर निर्णय घेतले आहे. पक्षविरोधी कारवाया करणे, पक्षाच्या अंतर्गत विषयाला सार्वजनिकपणे बोलत पक्षशिस्तीचे उल्लंघन करणे असे प्रकार काही जणांकडून करण्यात आले. पुढील काळात महायुतीविरोधात जो नेता किंवा कार्यकर्ता जाहीर बोलेल किंवा बंड पुकारेल त्याविरोधात कारवाई होईल. पक्षाच्या मंचावर निश्चित प्रत्येकाला नाराजी मांडता येईल, मात्र सार्वजनिकपणे पक्षविरोधी भूमिका मान्य करण्यात येणार नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# चित्रा चौकात युवकाची हत्या

## कोतवाली पोलीस आरोपीच्या शोधात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती-** एका युवकाची चाकूने वार करून हत्या केल्याची खळबळजनक घटना मंगळवारी (ता.१५) उशिरा रात्री कोतवाली पोलिस स्टेशन हद्दीतील चित्रा चौकातील मॅक्स मॉल समोर घडली.हत्या झालेल्या युवकाचे नाव गोलू उसरडे (रा. झाडीपुरा मसानगंज अमरावती) असे आहे. गोलू उसरडे हा सध्याकाळी मित्रासह चित्रा चौकात बसला होता. यादरम्यान दोन युवक आले आणि गोलूच्या छातीत चाकू मारून निघून गेले. चाकूचा घाव वर्मी बसल्याने गोलूचा मृत्यू झाला. गोलूच्या हत्येत आरोपी विक्की गुप्ता याचे नाव समोर आले असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. गोलू उसरडे ची हत्या होताव मसानगंज परिसरातील संतप्त नागरिक कोतवाली पोलिस ठाण्यावर धडकले व आरोपीच्या अटकेची मागणी केली. गोलू उसरडे याचे झाडीपुऱ्यात कटिंगचे दुकान असून अमरावती शहरात दरवर्षी तो सर्वात मोठी कावड यात्रा काढत होता. गोलूची नेमकी हत्या कोणत्या कारणातून झाली हे अद्यापही समजले नसून आरोपीच्या अटकेनंतर या मागचे कारण समजणार आहे. गोलूच्या पत्नीला तीन दिवसांआधी मुलगा झाला. मुलगा झाल्याचा आनंद घरात असतानाच गोलूची अचानक हत्या झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.



# उबाठा च्या शिवसैनिकांनी अधिकाऱ्यांसह स्वतःला तब्बल दोन तास घेतले कोंडून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती -**काही दिवसांपूर्वी अमरावती परतवाडा मार्गे धारणी-खंडवा जाणाऱ्या खासगी बसचा अपघात झाला होता. यामध्ये पाच ते सहा जणांचा मृत्यू झाला होता. सेमाडोहजवळ असलेल्या या पुलाची लांबी, रुंदी कमी असल्यामुळे हा अपघात घडला असून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी याआधी शिक्सेना यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करण्यात आली. मात्र, त्याची दखल न घेतल्याने अखेर शिवसेनेचे प्रवीण हरमकर यांनी कार्यकर्त्यांसह पीडब्ल्यूडीवर आंदोलन केले. या वेळी संतप्त झालेल्या शिवसैनिकांनी अधिकाऱ्यांसह स्वतःला तब्बल दोन तास कोंडून घेतले. आंदोलनाची तीव्रता बघता अधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

अमरावतीहून परतवाडा मार्गे धारणीवरून खंडवा जाणारी खासगी बस प्रवासी घेऊन जात असताना सेमाडोह गावालगत असलेल्या पुलावरून जाताना अपघात झाला. या अपघातात आदिवासी बांधव, आरोग्य सेवा देणारे कर्मचारी, अन्य प्रवासी जखमी झाले तर पाच ते सहा प्रवाशांचा मृत्यू झाला. या मृत्यूला श्वरूग्रयठ्ठ. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्षित धोरण तसेच या रस्त्याच्या कामात झालेला भ्रष्टाचार जबाबदार असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे म्हणणे आहे. हा अपघात नसून ही एक प्रकारची केलेली जाणीवपूर्वक हत्या असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेने केला आहे. या अपघातातील पीडब्ल्यूडीमधील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी दोनदा निवेदनातून केली मात्र, अद्याप याकडे लक्ष दिले नसल्याचा आरोप शिवसेनेने केला. तसा इशाराही याआधी शिवसैनिकांनी दिला होता. तत्पूर्वी, मंगळवारी दुपारी शिवसेनेचे प्रवीण यांच्या नेतृत्वात बांधकाम विभाग येथे शिवसैनिकांनी दिली. घडक या वेळी संतप्त शिवसैनिकांनी स्वतःसहम अधिकाऱ्यांना कोंडून घेतले. कारवाई होईपर्यंत दालनाबाहेर निघणार नाही, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली होती. या वेळी कार्यालय परिसरात खळबळउडाली होती. या आंदोलनाची तीव्रता बघता पोलिसांना बोलावण्यात आले. पोलिसांच्या मध्यस्थीने अधिकारी आणि आंदोलकांची भेट आणि चर्चा झाली. त्यानंतर हे आंदोलन मागे - घेण्यात आले. यावेळी प्रवीण हरमकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



# क्षुल्लक कारणावरून ब्लेड कटरने हल्ला, दोघे जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ यवतमाळ-** सिटी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत जुनीवस्ती भागातील महाराज चौकात सोमवारच्या सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान क्षुल्लक कारणावरून झालेल्या मारहाणीत दोन तरुण जखमी झाले आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. प्राप्त माहितीनुसार निखिल रामा तायडे (वय २४, रा.अण्णाभाऊ साठे नगर ) व त्याचा मित्र किरण अवलवार हे दोघे नेहमी प्रमाणे जुनीवस्ती भागात असलेल्या महाराजा हॉटेल वर चहा पिऊन गप्पा मारीत असतांना आरोपी अब्दुल जाफर अब्दुल अन्नान (वय २३, रा.जुनी वस्ती) हा तेथे उभा होता. दोघे मित्र बोलत असताना आरोपी अब्दुल जाफर याने त्यांना अश्लील व जातीवाचक शिवीगाळ केली. तुम्ही मला पाहून हसून राहिले असे सांगत त्याच्या जवळलील ब्लेड कटर ने निखिल वर वार केल्याने त्याच्या हातातून रक्त निघत असल्याने त्याचा मित्र किरण अवलवार हा भांडण सोडविण्याकरिता मधात गेला. त्याच्याही हातावर ब्लेड कटर ने वार करून त्याला देखील जखमी केले. घटना स्थळी माजी नगर सेवक तस्लिम भाई, हेड पोलीस कॉन्स्टेबल मंगेश थाटे, संजय तेलमोरे, व होमगार्ड सैनिक आटेकर हे पोहचले. यामुळे अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच सिटी पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अजित जाधव पथकासह घटनास्थळी पोहोचले. आरोपी अब्दुल जाफर अब्दुल अन्नान यास ताब्यात घेऊन त्याच्या विरुद्ध कलम१८१(१)३५१(२)३५२ र् ए सहकलम३(१) तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम नुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास मनोहर दाभाडे करीत आहे.

# कुख्यात दर्शन महल्लेविरुद्ध एमपीडीए

## एक वर्षासाठी जिल्हा कारागृहात स्थानबद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती -**
येथील कुख्यात गुन्हेगार दर्शन विलास महल्ले वय २२ वर्ष रा.शिवाजी चौक, नवसारी, अमरावती) याचेविरुद्ध एमपीडीए अन्वये कारवाई करण्यात आली. त्याला एक वर्षासाठी जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले.

दर्शन महल्ले हा सन २०२२ पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये लिप्त आहे. त्याचे विरूध्द गाडगेनगर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न करणे, दरवडया बद्दल शिक्षा, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याचा प्रयत्नासहीत जबरी चोरी किंवा दरोडा , गृह अतिक्रमण करणे, बलादग्रहणाबद्दल शिक्षा, बलादग्रहण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला क्षती पोचवण्याची भीती घालणे, दुखापत करणे, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याची धमकी, मानवी किंवा इतरांच्या व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल अशी कृती करणे, प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होवुन दंगा करणे, पन्नास रूपये इतक्या रकमेचे नुकसान करून आगळीक करणे, एखाद्या व्यक्तीने आपल्या कायदेशिर गिरफदारीला प्रतिकार किंवा अटकाव करणे, अश्लील कृती करणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, फौजदारीपात्र धाकदपटबद्दल शिक्षा, दोन किंवा अधीक व्यक्तींनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ केलेल्या कृती, अवैध्य शस्त्र बाळगणे, अग्णीशस्त्र बाळगणे अधिसुचनांचे उलघंन करणे, हद्दपार आदेशाचे उल्लघंन करणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकुण ११ गुन्हे दाखल आहे. त्याचेवर यापुर्वी प्रतिबंधक कारवई करण्यात आलेले आहे. तसेच त्यास तडीपार सुध्दा करण्यात आले होते तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सकीय आहे. त्यामुळे त्याच्याविरुद्ध गाडगेनगरचे ठाणेदार प्रशांत माने यांनी पोलीस आयुक्तालयात प्रस्ताव पाठवला. त्या प्रस्तावावर पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी १४ ऑक्टोबर रोजी आदेश पारीत केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे. गाडगेनगर मार्फत आदेश तामिल करून त्यास स्थानबध्दतेच्या कालावधी करीता मध्यवर्ती कारागृह अमरावती येथे १५ ऑक्टोबर रोजी दाखल करण्यात आले आहे. यापुढेही शहरातील सराईत गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायदयाखाली कारवाई करण्यात येणार आहे.




# बँक मॅनेजरच्या घरातच चोरट्यांनी मारला डल्ला

## दागिने केले लंपास, पवन नगरातील घटना, सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल लांबवल्याची फिर्याद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ यवतमाळ-** बँक मॅनेजरचे घर फोडून चोरट्यांनी तब्बल सव्वा दोन लाखाचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना शहरातील पवन नगरात सोमवारी दि. १४ ऑक्टोबर रोजी दोन वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात चौकशी अंती शहर पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, बँक मॅनेजरची पत्नी दीपिका ओजस वाळले (वय २८) वर्ष रा. मंगलमूर्ती नगर यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनूसार, दीपिका यांचे पती जन संघर्ष अर्बन बँकेत मॅनेजर असून ते बाहेरगावी काम करतात. अशातच दीपिका घराच्या दरवाजाला कुलूप कोंडा लावून त्यांच्या माहेरी गेल्या होत्या. घरात कोणीही नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाज्याला लावलेला कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटात ठेवलेले दोन लाख पाच हजार रुपयांचे सोन्याचे दागीने, १५ हजार रुपये किंमतीचे चांदीचे दागिने असा एकूण दोन लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही बाब सोमवारी घरी आल्यानंतर वाळले कुटुंबीयांच्या लक्षात आली. या घटनेची माहिती पुसद शहर पोलिसांना देण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. या प्रकरणी पुसद शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात विविध कलमान्वये गुन्हे नोंद केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शहर पोलिस करीत आहेत.



# रात्री साजरा केला वाढदिवस, सकाळी मृत्यू

## परीगणित कॉलनीतील घटना

**दि.१६ अमरावती-** येथील परी गणित कॉलनीमध्ये एक विचित्र प्रकरण समोर आले आहे. जिथे रात्री कुटुंबीयांनी वडिलांचा ६६ वा वाढदिवस उत्साहाने साजरा केला, त्यानंतर रात्री सर्वेजण आनंदात झोपले आणि सकाळी वडिलांचा मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार गोपीचंद बागडे (वय ६६,रा.परीगणित कॉलनी) यांचा वाढदिवस सोमवारी (दि.१४) रात्री साजरा करण्यात आला. वाढदिवस झाल्यावर ते झोपले होते. मंगळवारी (दि.१५) सकाळी त्यांना घाबरल्यासारखे वाटू लागले. त्यामुळे त्यांना प्रथम बागडे हॉस्पिटल येथे नेण्यात आले होते. तिथे डॉक्टरांनी त्यांना तपासून जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले. येथे डॉक्टरांनी गोपीचंद बागडे यांना मृत घोषित केले. यामुळे कुटुंबीयांना धक्का बसला आहे. काल वाढदिवसाचा उत्साह होता तिथे आज शोककळा पसरली आहे. शुभम राजेंद्र गजभिये (वय २६) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केले आहे. या घटनेमुळे परिसरात शोक पसरला आहे.

# संत साहित्य मानवी समाजासाठी वैचारिक धन-कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर

## विद्यापीठात 'लोकसंत गाडगे बाबा व जगद्गुरू तुकोबाराय : एक चिंतन' विषयावर चर्चासत्राचे उद्घाटन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

संत साहित्यात आध्यात्म आणि विचार असून संतांचे साहित्य हे विज्ञानवादी आहे. आध्यात्मिक जाणीव करुन देणारे साहित्य म्हणजे संत साहित्य होय. मानवी समाजासाठी संत साहित्य मोठे धन आहे, असे मौलिक विचार उद्घाटनीय भाषणातून रिध्दपूर मराठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र व जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्या सभागृहात 'लोकसंत गाडगे बाबा व जगद्गुरू तुकोबाराय : एक चिंतन' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, बीजभाषक जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष शिवश्री डॉ. सतिश तराळ, प्रमुख अतिथी म्हणून रिध्दपूर मराठी विद्यापीठाचे कुलसचिव तथा उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, जगद्गुरू तुकाराम महाराज संस्थान, देहूचे अध्यक्ष व संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज ह.भ.प. पुरुषोत्तम दत्तात्रय मोरे, विश्वस्त आणि संत तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ.प. माणिक महाराज मोरे, मराठा सेवा संघाचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष शिवश्री अरविंद गावंडे उपस्थित होते.

डॉ. आवलगावकर पुढे म्हणाले, संत साहित्यावरच आजचं साहित्य पोसलं जातंय. संत कोणाला म्हणावं, तर संत साहित्याचा डोळस बुध्दीने बघण्याचा विचार करणारा. मध्ययुगीन कालखंडामध्ये लिहिण्याची सुविधा नव्हती. मात्र अशाही परिस्थितीत संतांनी लेखन केलेले आहे. हे विश्वची माझे घर हा विचार जागतिक पातळीवर पोहचला पाहिजे. संत आज नाहीत, पण त्यांचे विचार कायम जीवंत आहेत. संतांची विचारसरणी पुढील पिढीपर्यंत पोहचवा, असे आवाहन याप्रसंगी डॉ. आवलगावकर यांनी केले.

### संत साहित्यात विवेकवादी दृष्टिकोन

बीजभाषण करतांना डॉ. सतिश तराळ म्हणाले, संत तुकाराम महाराजांचे अभंगविचार हे संत गाडगे बाबांच्या विचारात दिसतात. तुकाराम महाराज आणि संत गाडगे बाबा यांच्यात वैचारिक साम्य आहे. अभंगातून तुकाराम महाराजांचा आत्माविष्कार व भावविष्कार दिसून येतो. संत साहित्यातही विवेकवादी दृष्टिकोन दिसतो. संत गाडगे बाबा तुकाराम महाराजांना आपले गुरू मानत होते. गाडगे बाबांनी नवीन व प्रभावी कीर्तनशैली शोधून काढली. संत तुकाराम महाराज भागवत धर्माचे प्रवर्तक आहेत, असेही डॉ. सतिश तराळ म्हणाले.

### तुकाराम महाराजांचे विचार गाडगे बाबांनी सामाजात रुजविले

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, संत तुकाराम महाराजांनी मांडलेले विचार पुढे संत गाडगे बाबांनी समाजामध्ये रुजविले. गाडगे बाबांनी दहा लाख किलोमीटर प्रवास करुन पाच हजार कीर्तने केलीत. त्यांच्या १९५६ च्या अखेरच्या कीर्तनात गाडगे बाबांनी तुकाराम महाराजांचा वारंवार उल्लेख केला होता, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुध्दा गाडगे बाबांना आधुनिक तुकाराम महाराज असे संबोधले होते. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी तुकाराम महाराजांचे चरित्र व गाथा प्रसारित व्हावी, यादृष्टीने प्रयत्न केलेत. चर्चासत्रातून एक नवा विचार पुढे येईल, अशी अपेक्षा याप्रसंगी कुलगुरू डॉ. बारहाते यांनी व्यक्त केली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रकाश नांदुरकर यांनी संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार करीत असलेल्या कार्याची माहिती मनोगतातून दिली. तुकाराम महाराजांचे दहावे वंशज ह.भ.प. पुरुषोत्तम मोरे म्हणाले, संतांचे विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवणारे गाडगे बाबा होत. ह.भ.प. माणिक महाराज मोरे म्हणाले, अभंगांच्या माध्यमातून तुकाराम महाराजांनी समाजजागृतीचे मोठे कार्य केले आहे. सहसंचालक डॉ. केशव तुपे यांनीही याप्रसंगी अतिथीपर भाष्य केले.

संत तुकाराम महाराज व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीत व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे माजी प्रमुख एम.टी. देशमुख यांनी संत गाडगे बाबांच्या कीर्तनाचा वारक-यांसह प्रसंग सादर केला. याप्रसंगी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकातून चर्चासत्राच्या आयोजनामागील भूमिका संत गाडगे बाबा अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी मांडली. सूत्रसंचालन डॉ. राजेश मिरगे यांनी, तर आभार डॉ. राजकुमार दासरवाड यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला प्राधिकारिणींचे सन्माननीय सदस्य, विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच अमरावतीसह विभागातील अन्य जिल्ह्यांमधील संत तुकोबाराय साहित्य परिषदेचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भूमिका अभिनय व लोक नृत्य स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांकाने जि.प. माध्यमिक शाळा उत्तमसराचे विद्यार्थी सन्मानित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

प्रादेशिक विद्या प्राधिकरण जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अमरावती येथे राष्ट्रीय लोकसंख्या प्रकल्प २०२४-२५ अन्वये जिल्हास्तरीय भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धेचे जिल्हास्तरीय आयोजन करण्यात आले या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर लोकनृत्य स्पर्धेत मुले आणि मुली यांच्यासाठी संधीची समानता या विषयावरील नृत्यास द्वितीय क्रमांक देण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमास प्रादेशिक विद्या प्राधिकरणचे प्राचार्य डॉ.मिलिंद कुब्बडे, प्रा.डॉ.गावंडे सर. प्रा. सोनारे सर जि.प. माध्यमिक शाळा उत्तमसरा मुख्याध्यापक श्री. लोमेश खैरकर कु. शितल भोपाळे सौ. अश्विनी झाडे भातकुली पंचायत समितीचे विषयतज्ञ सतीश वानखडे उपस्थित होते. सहभागी कलाकार विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर प्रकारे सादरीकरण केले याकरिता गटशिक्षणाधिकारी दीपक कोकतरे साहेब यांनी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले. सहभागी विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन केले.

तसेच जि.प. माध्यमिक शाळा उत्तमसरा येथील संतोष कुर्हेकर,चंद्रशेखर ब्राह्मणकर,उमेश बसरे, श्रीमती. ज्योत्स्ना हायगले, श्रीमती. प्रतिभा नांदने, कुमारी प्राजक्ता भडके, भूषण बुरंगे,प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मिनाक्षी इंगळे,स.शि.राजेश सावरकर,गजानन येलोने,सौ.सुनिता अकर्ते,प्रमोद कांबळे यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

## समाजाला संघटीत करण्यासाठी सामुदायिक प्रार्थना-रायजीप्रभू शेलोटकर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ गुरुकुंज आश्रम**

भारत देशावर परकीयांची अनेक आक्रमने झाली तसेच दिडशे वर्ष इंग्रजांनी सुद्धा राज्य केले. इंग्रजांच्या वेळेस जनतेला संघठीत करणे कठिन होते त्यामुळे लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरुप देऊन जनतेला संघठीत करण्याचा प्रयत्न केला परंतु गणेशोत्सव केवळ दहा दिवस असल्यामुळे इंग्रजांविरूद्ध जनतेला केवळ दहा दिवसात संघटीत करुन इंग्रजी सत्तेविरूद्ध चिड निर्माण करणे कठिन होते. ही बाब राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी हेरली आणि त्यासाठी कायम स्वरुपी जनतेला संघटीत करण्यासाठी त्यांनी सामुदायिक प्रार्थना निर्माण केली असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवातील सामुदायिक प्रार्थनेवरील चिंतनात रायजीप्रभू शेलोटकर यांनी केले. ते पुढे म्हणाले की, सामुदायिक प्रार्थनेचे तिन टप्पे असून एक सामुदायिक प्रार्थना का निर्माण झाली, दोन सामुदायिक प्रार्थना का करावी, तिन सामुदायिक प्रार्थनेची फलश्रृती काय आहे? राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मानवतावादी संत होते सर्वधर्मपंथापेक्षा लोकांमध्ये मानवता निर्माण झाली पाहिजे हाच त्यांचा प्रयत्न होता. पृथ्वीवर चौ-यांशी लक्ष योनी असून मानव ही त्यातली एक योनी आहे. गुरुकृपेनेच मानवाला ही योनी प्राप्त होते. त्यासाठी साधना व उपासना करणे आवश्यक आहे. सामुदायिक प्रार्थनेमुळे स्थितप्रज्ञता प्राप्त होत असून त्यामुळे शत्रुत्व कमी होते आणि या भवसागरातून तरुण जाण्यासाठी सामुदायिक प्रार्थनेची गरज आहे.

### आजचे कार्यक्रम

गुरुवार,पहाटे ५.३० ते ६.३०: सामुदायिक ध्यान आणि चिंतनः विलास साबळेसकाळी ७ ते ८ : योगासन व प्राणायामसकाळी ८ ते ९ : ग्रामगीता प्रवचन निळकंठ हळदेसकाळी ११.३० ते १२.३० अभंग वाणी कु. धनश्री खंडारेदुपारी १२ ते ५ : महिला संमेलन अध्यक्ष - सौ. पुष्पा बोंडे प्रमुख अतिथी - वैशाली धुमोणे (सरपंच गुरुदेवनगर), सभापती कल्पना दिवे, डॉ. लक्ष्मी जवंजाळ, डॉ. वसुंधरा बोंडे, डॉ. नयना कडू, गौरी देशमुख, संगीता शिंदे, माधुरी ढवळे.संध्याकाळी ६ ते ७: सामुदायिक प्रार्थना आणि चिंतन श्रीमती. पुष्पा बोंडेरात्री ७ ते ८ : खंजिरी भजन - क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला भजन मंडळ चनाखा संयोजक : साईनाथ आकनुरवाररात्री ८ ते ९.३० : कीर्तन ज्योतीताई धनाडेरात्री ९.३० ते १०.३० : कीर्तन नारायणदास पडोळेवरील वृत्तासोबत छायाचित्र पाठवित आहे. कृपया प्रसिद्धी देण्यात यावी.

## रब्बी हंगामात भूईमुंग, जवस, मोहरीच्या लागवडीकडे कल : कृषी विभागाची नियोजनाकडे वाटचाल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ तिवसा/धामणगाव**

शेतकऱ्यांकडे सिंचनाच्या सुविधा वाढत गेल्याने दिवसेंदिवस रब्बी पिकांचे क्षेत्रसुद्धा वाढत गेले असल्याचे दिसून येत आहे. रब्बी पिकांच्या माध्यमातून शेतकऱ्याला दुबार पिकांची संधी निर्माण होते. यावर्षीच्या रब्बी हंगामात तेलवर्गीय भूईमूग, जवस, मोहरी या पिकांचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने कृषी विभागाने नियोजन केले आहे.

जिल्ह्यात सिंचन क्षेत्र वाढले असून पीक पध्दतीबाबत शेतकऱ्यांत जागृती होण्यास सुरुवात झाली आहे. खरिपातील पिके निघाल्यानंतर जवळपास आठ महिने बेरोजगारीचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. या कालावधीत रोजगारासाठी इतरराज्यांत किंवा जिल्ह्यात वणवण भटकावे लागते. दुसऱ्या राज्यात जाऊन रोजगार करण्यापेक्षा आपल्याच शेतीत राबलेले चांगले असा विचार करून शेतकरी आपल्याच शेतात विविध पिकांची लागवड करत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे खरीप पिकांच्या तुलनेत रब्बी पिकांचा खर्च कमी असते. तसेच ही पिके कमी पाण्यावर जगतात. विशेष करून शेतकरीवर्ग आता भाजीपाल्याची पिकेही मोठ्या प्रमाणात घेत आहेत.

## सासू-सासऱ्याची अडचण नको; हवा फक्त राजा-राणीचा संसार

### मानसिकता : किरकोळ कारणांवरून प्रकरणे जाताहेत घटस्फोटापर्यंत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

आजकाल मोजकेच अपवाद सोडता समाजातील 'एकत्र कुटुंब' पद्धती जवळपास नामशेष झाली आहे. 'मायक्रो फॅमिली'ची संकल्पना मोठ्या प्रमाणात रुजत आहे.

केवळ राजा-राणीचा संसार हवा. त्यात कोणाचाही हस्तक्षेप नको. अगदी सासू-सासऱ्याचीसुद्धा अडचण नको, अशी दाम्पत्यांची मानसिकता झाली आहे. अगदी अशाच किरकोळ कारणांवरून प्रकरणे घटस्फोटापर्यंत विकोपाला जात आहेत.समाजात सध्या विविध कारणांनी घटस्फोट घेण्याची मानसिकता वाढत आहे. त्यात प्रामुख्याने इगो, मोबाइल, विवाहबाह्य संबंध, दोघेही कमावणारे आदी कारणांवरून प्रकरणे घटस्फोटापर्यंत जात आहेत.



नोकरी करणाऱ्या दाम्पत्यापैकी कोणाचाही अहंकार दुखावल्यास प्रकरण घटस्फोटापर्यंत जाते.मोबाइलचा वापर अति वाढला आहे. परिणामी जोडीदाराचा संशय वाढतो, त्याचा गैरसमज होतो. जोडीदाराला 'पासवर्ड' देत नाही, पत्नी सतत माहेरी बोलते, माहेरचे लोक भडकावतात, सासू-सासऱ्यांविषयी गैरसमज करून देतात, नको ते संदेश येतात, या कारणांवरून सुद्धा प्रकरण - घटस्फोटापर्यंत जाते.

कपडे बदलल्यासारखे घटस्फोट घेणाऱ्या - पाश्चिमात्यांचे अनुकरण होत आहे. परिणामी प्रकरण घटस्फोटापर्यंत जाते.

### विवाहबाह्य संबंध

दोघांपैकी कोणाचीही संशयास्पद मैत्री असल्यास, नको असलेली छायाचित्रे आणि संदेश, जोडीदाराचे विवाहबाह्य संदेश इत्यादी कारणांवरून प्रकरण घटस्फोटापर्यंत जाते.

### सासू-नणंदेचा हस्तक्षेप

मुलाच्या संसारात सासू अथवा नणंदेचा प्रमाणाबाहेर हस्तक्षेप वाढल्यास सुनेला सासू व नणंद घरात नको, असे वाटते. या कारणावरूनही प्रकरण घटस्फोटापर्यंत जाते.

### पैशांची मागणी

आहे त्यात समाधान मानण्याची वृत्ती लोप पावली आहे. पैशांची मागणी वाढली आहे. काही प्रमाणात वैवाहिक जीवनात अतृप्तता या कारणावरूनही प्रकरणे घटस्फोटापर्यंत जात आहेत.

## शहरात आढळला पांढरा विषारी मण्यार दुर्मीळ साप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

साप म्हटला की आपल्या मनात, डोळ्यासमोर काळ्या, हिरव्या किंवा पिवळ्या रंगाचे साप उभे राहतात. सोमवारी कार्सचे सर्पमित्र पवन बघल्ले यांना रेवसा गावात 'अल्बिनो मण्यार' हा पांढऱ्या रंगाचा साप आढळला. अल्बिनिझम हा प्रकार दुर्मीळ असल्यामुळे पवन बघल्ले यांनी त्या सापाची माहिती कार्सचे राघवेंद्र नांदे आणि चेतन भारती यांना दिली. सर्पतज्ज्ञ राघवेंद्र नांदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मण्यार हा साप विषारी असून, तो निशाचर आहे. सरपटणाऱ्या प्राण्यांमधील 'अल्बिनिझम' ही एक आनुवंशिक स्थिती आहे, जी उत्परिवर्तन किंवा जनुकीय बदलांमुळे घडते. त्यात मेलेनिन तयार करणारे जीन नसतात. त्यामुळे रंगद्रव्य जे खवल्यांना आणि डोळ्यांना रंग देतात, ते तयार होत नाही. अल्बिनो साप पिवळे, त्यापैकी काही लाल, गुलाबी किंवा केशरीही असू शकतात. या सापाची नोंद सोमवारी अमरावती वनविभागात करण्यात आली.

# विधानसभेच्या रणसंग्रामाला सुरुवात उमेदवारांसह नेत्यांचा लागणार कस

## आठ ही विद्यमान आमदारांची परीक्षा, कोण होणार उत्तीर्ण

**अरुण जोशी**




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती**


विधानसभा निवडणुकीचा शंखनाद झाला असून, २० नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीत आठ हीविद्यमान आमदार पुन्हा रिंगणात राहणार हे निश्चित आहे. गेली पाच वर्ष केलेल्या कामांचा निकाल देण्याची वेळ आता मतदारांची आहे. आठ ही विद्यमान आमदारांची परीक्षा असून, लोकशाहीच्या या उत्सवात कोण उत्तीर्ण होणार हे २३ नोव्हेंबरला निवडणूक निकालानंतर कळेल. त्यासाठी आता पुढील ३५ दिवस हे फार महत्वपूर्ण असणार आहेत.

सन २०१९च्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील मतदारांनी कुणाही एका पक्षाला कौल दिला नव्हता. आठही मतदारसंघात वेगवेगळे चित्र होते.मोर्शी/वरुड मतदार संघात भाजपाचे दिग्गज नेते डॉ.अनिल बोंडे यांना पराभवाचा सामना करावा लागला होता.तर तिवसा,अचलपूर,बडनेरा,मेळघाट आणि धामणगाव रेल्वे ,अमरावती या मतदार संघात अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत अचलपूर मतदार संघात प्रहार चे बच्चू कडू यांनी बाजी मारली होती तर बडनेरा मध्ये युवा स्वाभिमानाचे रवी राणा हे विजयी झाले होते.तर तिवसा मतदार संघात अगदी अखेरच्या क्षणी यशोमती ठाकूर यांनी विजयश्री खेचून आणत विजय प्राप्त केला तर धामणगाव रेल्वे मतदार संघात प्रतापदादा अडसड यांना मतदारांनी कौल देत विजयी केले. मेळघाट मध्ये राजकुमार पटेल यांनी प्रहार ची उमेदवारी घेत विजयश्री खेचून आणली होती तर अमरावती विधानसभा क्षेत्रात सुलभा खोडके यांनी डॉ.सुनील देशमुख यांचा पराभव केला होता.दर्यापूर मतदार संघातून बळवंत वानखडे हे विजयी झाले होते. मात्रसन २०१९च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत सन २०२४ ची विधानसभा निवडणूक फार वेगळीआहे. या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी हे नवीन समीकरण तयार झाले आहे. त्यामुळे उमेदवारी कुणाला जाहीर होते, कोण नाराज होऊन बंडखोरी करतो आणि नेमके कुणाचे समीकरण बिघडवितो हे सुद्धा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.त्यामुळे विद्यमान आमदार सोडून इतर कोणत्या उमेदवारांना तिकीट मिळणार लढत कशी होणार याकडेसर्वांचे लक्ष लागले आहे.

# दिवाळीची ऑनलाइन खरेदी करताना काय काळजी घ्याल?

## बनावट लिंकवरून खरेदी केली तर होऊ शकते फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती**



दिवाळीचा सण आता तोंडावर येऊ लागला आहे. या काळात मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. सध्या ऑनलाइन खरेदी वाढली असून, त्यात फसवणुकीचा धोकाही वाढू लागला आहे.

मागील काही वर्षांमध्ये ऑनलाइन खरेदीचे प्रकार वाढले आहेत. दिवाळीमध्ये ऑनलाइन खरेदीवर वेगवेगळ्या ऑफर दिल्या जातात. त्यामुळे या ऑफरचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात ऑनलाइन खरेदी केली जाते. परंतु, ही खरेदी करीत असताना कोणत्या साइटवरून करावी? कोणते ॲप खरे? कोणते खोटे? याची माहिती नसते आणि त्यातून फसवणूक होण्याची शक्यता वाढते. अशी काही प्रकरणेही घडली आहेत. ऑफरला भुलून कोणत्याही लिंकवरून खरेदी केली तर फसवणूक होईल. त्यामुळे दिवाळीची ऑनलाइन खरेदी करीत असताना नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे.

**ऑनलाईन खरेदी करताना हे लक्षात ठेवा**

**सुरक्षित वेबसाईट :** आपण ज्या ऑनलाइन लिंकवरून खरेदी करीत आहोत, ती वेबसाईट सुरक्षित आहे का? याची तपासणी करून घ्यावी.

**अनोळखी लिंक टाळा:** सोशल मीडियावर लिंक देऊन खरेदीची ऑफर दिली जाते, अशा अनोळखी लिकवरून खरेदी करणे टाळावे.

**बँक खाते, कार्डचा तपशील सांभाळा :** कोणत्याही लिंकवर बँक खाते क्रमांक आणि कार्डचा तपशील विनाकारण देऊ नये.

**अनोळखी ॲप टाळा :** अनोळखी ॲपवरून खरेदी करणे टाळावे. विश्वासार्हता सा लक्षात घ्या.

**ओटीपी शेअर नको :** कोणतीही वस्तू खरेदी केल्यानंतर मोबाइलवर आलेला ओटीपी शेअर करू नये. कस्टमर केअर नंबर शोधताना काय काळजी घ्याल ? खरेदी केल्यानंतर काही अडचणी निर्माण होतात. मग त्यानंतर कस्टमर केअर क्रमांक शोधला जातोतो ऑनलाइन शोधू नये, अधिकृत ॲपवर कस्टमर केअर क्रमांक दिलेला असतो. त्यावरच संपर्क साधावा.

**...तर तीन तासांत करा सायबरकडे तक्रार**

फसवणूक झाल्यास सायबरकडे तक्रार करणे अनिवार्य आहे. तीन तासांत तक्रार केली तर नुकसान टळू शकते.

सायबरच्या पोर्टलवरही करता येते तक्रार cybercrime.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन रितसर तक्रार नोंदविता येते. या संकेतस्थळाला भेट दिली पाहिजे.

# माध्यमिक शाळांना दिवाळीच्या तीन आठवडांच्या सुट्ट्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती**



सध्या प्रथम सत्रांत परीक्षा सुरू झाल्या आहेत. साधारणतः या परीक्षा २६ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहेत. २८ ऑक्टोबरपासून शाळांना तथा विद्यार्थ्यांना दिवाळीची सुट्टी लागणार आहे. माध्यमिक विभागाच्या त्यांच्या परिपत्रकानुसार १६ नोव्हेंबरपर्यंत दिवाळीची सुट्टी आहे, पण १७ नोव्हेंबरला रविवार असल्याने माध्यमिक शाळा १८ नोव्हेंबरपासून सुरू होतील. त्यामुळे यंदा विद्यार्थ्यांना व शाळांना २१ दिवस दिवाळीची सुट्टी असणार आहे.

माध्यमिक चे शिक्षणाधिकारी रवींद्र सलामे यांनी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या विविध संघटनांची एकत्र बैठक घेऊन शैक्षणिक सत्राच्या सुट्ट्या ठरविण्यात आल्या होत्या. विविध शाळांच्या नियोजनाप्रमाणे २६ ऑक्टोबरपूर्वी पहिल्या सत्राची परीक्षा संपणार आहे. सध्या अनेक शाळांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. दिवाळीपूर्वी होणाऱ्या पहिल्या सत्र परीक्षेपूर्वी शाळांनी विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करून घेतली आहे.सध्या तोंडी, प्रात्यक्षिक, सराव सुरू असून २६ ऑक्टोबरपर्यंत सर्वच शाळांच्या पहिल्या सत्राच्या परीक्षा संपतील, असे नियोजन करण्यात आलेआहे. दिवाळीनंतर विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार असल्याने अनेक शाळांनी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांच्या पालकांना मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले आहे.

### 'या' वर्षातील उर्वरित सुट्या


दिवाळी सुट्टी (२८ ऑक्टोबर ते १६ नोव्हेंबर), १५ नोव्हेंबर (गुरुनानक जयंती), २५ डिसेंबर (ख्रिसमस), १४ जानेवारी (मकर संक्रांती), २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन), १९ फेब्रुवारी (छत्रपती शिवाजी महाराज जयंती), २६ फेब्रुवारी (महाशिवरात्री), १४ मार्च (धूलिवंदन), १९ मार्च (रंगपंचमी), ३० मार्च (गुढीपाडवा, रमजान ईद), ६ एप्रिल (रामनवमी), १० एप्रिल (महावीर जयंती), १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), १८ एप्रिल (गुडफ्रायडे), १ मे (महाराष्ट्र दिन), २० मे ते २५ जून (उन्हाळा सुट्टी), २६ जूनपासून पुढच्या नवीन सत्राची सुरुवात होईल.

# अचलपूर नगरीला लोटपोट करायला येत आहे 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' १८ ऑक्टोबरला गांधीपूल येथे भव्य आयोजन

## सिने अभिनेत्री सई ताम्हणकर सह हास्यजत्रेतील महारथी कलाकारांची उपस्थिती : आ. बच्चू कडू यांचीही होणार ग्रँड मुलाखत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अचलपूर**

अवघ्या महाराष्ट्राला वेड लावणारी 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' येत्या १८ ऑक्टोबर रोजी अचलपूर नगरीला लोटपोट करायला येत आहे.सिने अभिनेत्री सई ताम्हणकर यांच्यासह हास्यजत्रेतील सर्व महारथी कलाकारांची या कार्यक्रमाला उपस्थिती असणार आहे शिवाय आ. बच्चू कडू यांची ग्रँड मुलाखत सुद्धा या मंचावर घेण्यात येणार आहे.अचलपुर मधील गांधीपुलावर सायंकाळी ६ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम




देखील याठिकाणी पार पडणार आहेत. महाराष्ट्राला खदखदून हसवणारे अभिनेते डॉ. निलेश साबळे, भाऊ कदम,पृथ्वीक प्रताप, शिवाली परब,सुपर्णा शाम आदी मराठमोळे कलाकार पहिल्यांदा अचलपूर मधील नागरिकांना लोटपोट करायला येत आहे. आ. बच्चू कडू यांच्या वतीने अचलपूर मतदार संघातील माताभगिनी आणि बंधूंसाठी या हास्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्रातील प्रेक्षकांना टीव्ही समोर खिळवून ठेवणाऱ्या महाराष्ट्राची हास्यजत्रेने आजवर मोठ्या शहरातच लाईव्ह कार्यक्रमांचे आयोजन केले. मात्र पहिल्यांदा अमरावती जिल्ह्यात आणि त्यातही अचलपूर सारख्या ठिकाणी या कार्यक्रमाचे खास आयोजन करण्यात आले आहे. हस्यजत्रेच्या या मंचावर डॉ. निलेश साबळे हे आ. बच्चू कडू यांची मुलाखत घेणार असून ही मुलाखत अवघ्या महाराष्ट्रात भूकंप करणार असल्याचा अंदाज यानिमित्ताने लावण्यात येत आहे. या कार्यक्रमांसोबत महिलांसाठी अगदी फेव्हरेट असलेल्या भावोजींचा होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.अचलपूर नगरीत पहिल्यांदा होत असलेल्या महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# २८ ते २९ ऑक्टोंबरला कल्पक किल्ले बनवा स्पर्धा चे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती**

श्री विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय, दस्तुर नगर सेवा समिती, विदर्भ मल्लखांब असोसिएशन, जगतगुरु महर्षी व्यास शिक्षण संस्था, अमरावती, श्री गणेश मंदिर संस्थान, अंबिका नगर, राजापेठ स्पोर्टिंग क्लब, महाराष्ट्र राज्य विद्यार्थी कल्याण शिक्षक पालक संघ व वाचन प्रेमी संघ, शंभुशौर्य मर्दानी आखाडा, द्वारा भव्य दिनांक २८ ते २९ ऑक्टोंबर ला कल्पक किल्ले बनवा स्पर्धा चे आयोजन करण्यात आले आहे. हे वर्ष कल्पक किल्ले बनवा स्पर्धेचे ३० वे वर्ष आहे. महाराष्ट्राच्या या कणखर भूमीवर स्वराज्याचे तोरण बांधणाऱ्या राजे छत्रपती शिवाजी राजांच्या या मातीशी इमान राखणाऱ्या महाराष्ट्राच्या पुत्रांसाठी कल्पक किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.रविवार दि. २७/१०/२०२४ रोजी, वेळ: सायं ५:०० वा.- किल्ले बनविण्याकरिता जागा वाटप करण्यात येईल.तसेच माती आणि पाणी आयोजक मंडळींच्या मार्फत स्पर्धकांना दिल्या जाईल.सोमवार दि. २८/१०/२०२४वेळ:- सकाळी ७:३० वा. - किल्ले बनविण्यास प्रारंभ होईल.मंगळवार



दि. २९/१०/२०२४वेळ:- दुपारी ०३:०० वा. पर्यंत किल्ले बनवून, सजवून पूर्ण होतील.४:०० वा परीक्षण होईल व नंतर५:०० वाजता समारोपीय कार्यक्रम आणि बक्षीस वितरण.स्पर्धेकरीता वयोगटान्वये दोन गट करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गटामध्ये प्रथम २००१/-, द्वितीय१२०१/-, तृतीय ७०१/- व प्रोत्साहन ३०१/- असे बक्षीस राहतील.संभाजी गट:- ०६ वर्ष ते १५ वर्षेशिवाजी गट:- १६ वर्ष ते वरीलस्पर्धेत एक किल्ला गटात कमीत कमी १ तर जास्तीत जास्त ४ स्पर्धक राहू शकतात. गटातील प्रत्येकाला आकर्षक प्रमाणपत्र देण्यात येईल.प्रवेश शुल्क गटासाठी ६०/- रुपये राहील.जास्तीत जास्त लोकांनी या स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कल्पक किल्ले बनवा समिती २०२४ यांनी केले आहे.स्पर्धेचे स्थळ:- श्री गणेश मंदिरा जवळ, म. न.पा. १६ नं शाळा, अंबिका नगर मैदान, कवर नगर, अमरावती.

अधिक संपर्क - सुनील ह. पांडे ९३७२७९११९४३कु. अनुराधा सु. पांडे ९४०३३५५३३१प्रथमेश सिंग ९६२३४१३३२२रक्षित खानिवाले ८७६६५६६९५२सुनील देशमुख ८००७४४८७९७

# आदर्श आचारसंहिता लागू, फाईल्सचा घाईत निपटारा : ग्रामीण भागात विकासकामांचे काढले फलक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता कधीही लागू शकतेत्याआधी आपापली कामे पूर्ण करून घेण्यासाठी जिल्हा परिषद जिला नियोजन समिती विविध शासकीय कार्यालयात मोठी लगबग सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान, मंगळवारी आचारसंहिता लागू होईल असे गृहीत धरून अनेकांनी कामाचे नियोजन करून ते आटोपून घेतले, मंत्री, खासदार, आमदार यांनी शासनाकडून वेगवेगळ्या योजनांमधून मंजूर करून आणलेला निधी, त्याअंतर्गत निविदा, कार्यारंभ आदेश आचारसंहितेआधी काढण्यात आले. प्रशासकीय यंत्रणेने मंजूर कामाचा श्रीगणेशा सोमवार व मंगळवारी दुपारपूर्वी आटोपून घेतला.




जिल्हा नियोजन समितींमधून एकदा का निधी जिल्हा परिषदेकडे आला की तो खर्च करण्यासाठी दोन वर्षाची मुदत असते. त्यामुळे नावीन्यपूर्ण योजना साळेच्या बांधकामासाठीचा निधी महिला बालकल्याण आणि समाजकल्याणसाठी बंधनकारक निधी जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याची प्रक्रिया याआधीच पूर्ण झाली आहे. विभागांनी प्रशासकीय मान्यता दिल्या की ती कामे जिल्हा नियोजन समितीकडे पाठवली जातात. त्यामुळे प्रत्येक शासकीय कार्यालयात गेल्या दोन दिवसांपासून लगबग वाढली होती. निवडणुकीसाठीआचारसंहिता लागू होताच प्रशासनाकडून तत्काळ अंमलबजावणी करण्यात आली. या काळात मतदारांवर प्रभाव पडेल, असे कोणतेही काम करण्यात येणार नाही. त्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही सोमवारीच पूर्ण करून घेण्यात आली.

**मान्यतेअभावी रखडली अनेक कामे**

निवडणुकीची आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू होण्याची चिन्हे ओळखून आधीच विकासकामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. ही कामे निवडणूक काळात करता येणार असली तरी, अन्य कोट्यवधी रुपयांच्या घरात असणारी विकासकामे थांबली आहेत.यामध्ये बांधकाम, पाणीपुरवठा व स्वच्छता, महिला व बालकल्याण, समाजकल्याण, शिक्षण विभाग, आरोग्य विभागातील कामांचा समावेश असल्याची माहिती आहे. ग्रामपंचायत स्तरावरील काही कामे रखडली असल्याची माहिती आहे.

**बदली अन् भरती प्रक्रियांना लागला ब्रेक**

कामगार, आंतरजातीय विवाह अनुदान, वृद्ध कलावंत, निराधार योजनेच्या प्रस्तावासाठी लाभार्थ्यांना निवडणुकीचा निकाल लागेपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यानंतरच प्रस्ताव स्वीकारण्यात - येणार आहे. आचारसंहिता लागू झाल्याने अनेक विभागाच्याप्रशासकीय व विनंती बदली प्रक्रिया लांबणीवर पडल्या आहेत. विविध पदांच्या भरती प्रक्रियांना पूर्णता ब्रेक लागला आहे. कर्मचारी व अधिकाऱ्यांचा पूर्ण फोकस निवडणुकीवर राहणार आहे. आता प्रशासन पूर्णपणे निवडणुकीच्या मिशन मोडवर येणार आहे.